# ग्राहक गा-हाणे निवारण मंच

## महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित

## औरंगाबाद परिमंडळ औरंगाबाद.

**Old Power House Premises, Dr.Ambedkar Road, Aurangabad. Phone No.2336172**


No,CGRF/AZ/U/155/2008/76/ Date :-

To,
The Executive Engineer ( Administration)
O/O Superintending Engineer
O&M Urban Circle, M.S.E.D.C.L.,
Aurangabad.

Sub :- Forwarding of grievance in respect of Sau Malati Dinkarrao Kolapkar, Shop No.1,Ground floor, Kalaniketan Apartment, NS-4 CIDCO, Aurangabad.
(Con. No. 490011505926).

Dear Sir

Please find enclosed herewith a copy of the grievance application received by the Forum from Sau Malati Dinkarrao Kolapkar, Shop No.1 Ground floor, Kalaniketan Apartment, NS-4 CIDCO, Aurangabad.

**The consumer has requested for passing an interim order for not to disconnect his supply on account of excesss/average bills.**

You are requested to submit your parawise reply at the time of hearing which will be held on **05.12.2008 at 13.30 Hours**

Member Secretary
CGRF, (AZ) MSEDCL,
Aurangabad.

Encl: As above.

**Copy to:-**

Sau Malati Dinkarrao Kolapkar,
Shop No.1 Ground floor,
Kalaniketan Apartment, NS-4 CIDCO,
Aurangabad.

# ग्राहक गा-हाणे निवारण मंच

## महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित
## औरंगाबाद परिमंडळ,औरंगाबाद.

**तक्रार क्र.सीजीआरएफ/एझेड/यु/१५५/२००८/७६**

**तक्रार दाखल दिनांक ;- २५/११/२००८**
**निकाल दिनांक ;- २०/०१/२००९**

**सौ. मालती दिनकरराव कोलपकर,**
**दुकान नंबर ०१, कलानिकेतन अपार्टमेंट,**
**एन एस ४,सिडको एन ४ च्या मागे,**
**औरंगाबाद.**
**(ग्राहक क्र.४९००११५०५९२६) अर्जदार/ग्राहक**

**विरुध्द**

**महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित शहर मंडल औरंगाबाद.**

**गैरअर्जदार**

| | | |
|---|---|---|
| **कोरम** | **विष्णु अं. हंबिरे** | **अध्यक्ष** |
| | **हेमंत अ. कापडीया** | **सदस्य** |
| | **प्र. अ. सगणे** | **सदस्य/सचिव** |

# आदेश

अर्जदाराने ग्राहक गा-हाणे निवारण मंचासमोर 'अनुसुची - अ' मध्ये, महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग (ग्राहक गा-हाणे निवारण मंच व लोकपाल ) विनियम २००६ च्या नियम ६.१० अंतर्गत

तक्रार दाखल केली आहे. अर्जदाराने दाखल केलेल्या तक्रारीची एक प्रत दिनांक २५/११/२००८ रोजी औरंगाबाद शहर मंडळाचे कार्यकारी अभियंता ( प्रशासन ) व नोडल अधिकारी, औरंगाबाद यांना पाठविण्यात आली. अर्जदाराच्या गा-हाण्याबाबतची सुनावणी दिनांक ०५/१२/२००८ रोजी ठेवण्यात आली.

ग्राहकाने दाखल केलेल्या तक्रारीचा सारांश खालीलप्रमाणे आहे.

१) अर्जदाराने दाखल केलेल्या तक्रारीनुसार त्यांनी महावितरण कंपनीकडुन वाणीज्य वापरासाठी (दुकानासाठी) वीज पुरवठा घेतला आहे. त्यांना महावितरण कंपनी तर्फे सप्टेबर २००५ मध्ये मीटर फॉल्टी दाखवत चुकीचे वीज बिल देण्यात आले. याबाबत त्यांनी महावितरणच्या संबंधीत विभागाकडे तक्रार केली पण त्याची कोणतीही दखल न घेता त्यांना चुकीचे असलेले वीज बिल भरण्यास सांगण्यात आले. अर्जदाराने सुधारीत वीज बिल तसेच वीज पुरवठा खंडीत न करण्याबाबत महावितरण कंपनीस आदेश देण्याची विनंती मंचास केली आहे.

२) दिनांक ०८/१२/२००८ रोजी अर्जदार प्रतिनिधी विनय कोलपकर उपस्थित होते नोडल अधिकारी श्री राठौर यांनी संबंधीत विभागाकडुन कागदपत्रे न मिळाल्यामुळे सुनावणी तारीख वाढवुन देण्याची विनंती केली. अर्जदाराने दाखल केलेल्या कागदपत्राची पाहणी करून व प्रथमदर्शनी अर्जदारास चुकीचे वीज बिल देण्यात आलेले दिसुन आल्यामुळे अर्जदाराचा वीज पुरवठा त्यांने मंचात दाखल केलेल्या गा-हाण्याचे निवारण होईपर्यत खंडीत न करण्याबाबत अंतरिम आदेश महावितरण कंपनीस दिला व पुढील सुनावणी दिनांक १६/१२/२००८ रोजी ठेवण्यात आली.

३) १६/१२/२००८ रोजी सुनावणीस अर्जदार उपस्थित नव्हते महावितरण कंपनीतर्फे नोडल अधिकारी श्री राठौर, उपकार्यकारी अभियंता श्री गर्गे तसेच

कनिष्ठ अभियंता श्री कानेगावकर उपस्थित होते. नोडल अधिकारी यांनी अर्जदाराच्या मीटरचे सिल संशयास्पद असल्याचे सांगत मंचास स्थळपाहणी करण्याची विनंती केली. मंचाने याप्रकरणाची पुढील सुनावणी दिनांक १९/१२/२००८ रोजी घेण्याचे ठरविले.

४) दिनांक १९/१२/२००८ रोजी झालेल्या सुनावणीच्या वेळी अर्जदार प्रतिनिधी तसेच नोडल अधिकारी उपस्थित होते. मंचाने अर्जदार व नोडल अधिकारी यांच्या उपस्थितीत स्थळपाहणी करण्याचा निर्णय घेतला. दिनांक १९/१२/२००८ रोजी करण्यात आलेल्या स्थळ पाहणीच्या वेळी अर्जदाराच्या मीटरचे दोन्ही पेपर सिल व्यवस्थीत असल्याचे आढळुन आले. मीटरच्या डाव्या बाजुकडील लिड सिल नसल्याचे तसेच तेथील स्क्रु ढिला असल्याचे आढळुन आले. मंचाने नोडल अधिकारी यांना अर्जदाराचे मीटर बदलुन त्याजागी नवीन मीटर लावण्याचे आदेश देत जुने मीटर अर्जदाराच्या उपस्थितीत चाचणी करण्याचा आदेश दिला व पुढील सुनावणी अगोदर चाचणी अहवाल मंचात दाखल करण्याचे सांगितले या प्रकरणी पुढील सुनावणी दिनांक ०६/०१/२००९ रोजी घेण्याचे ठरविले.

५) दिनांक ०६/०१/२००९ रोजी अर्जदार व नोडल अधिकारी उपस्थित नव्हते. नोडल अधिकारी यांनी चाचणी अहवाल मंचात सादर न केल्यामुळे त्यांना तो दिनांक २०/०१/२००९ पर्यत दाखल करण्याचे आदेश देत मंचाने हे प्रकरण निकालासाठी ठवले.

६) अर्जदार व नोडल अधिकारी यांनी मंचात दाखल केलेल्या कागदपत्रावरून असे दिसुन येते की,महावितरण कंपनीतर्फे अर्जदारास २५/०९/२००० रोजी वाणीज्य वापरासाठी वीज पुरवठा करण्यात आला. ऑक्टोबर २००३ पर्यत अर्जदारास मिटर वरील नोंदीप्रमाणे वीज बिल आकारण्यात येत होते. डिसेबर २००३ पासुन मागिल रिडींग व चालु रिडींग १२४२ दाखवत कधी नॉर्मल तर कधी फॉल्टी स्टेटस दाखवत महावितरण कंपनीतर्फे सरासरीवर आधारीत वीज बिल आकारणी करण्यात आल्याचे दिसुन येते.दिनांक१९/१२/२००८ रोजी

मंचातर्फे करण्यात आलेल्या स्थळ पाहणी अहवालात मीटर वरील रिडींग १२४२ अशी असल्याचे आढळुन आल्यामुळे हे मीटर बंद असल्याचे स्पष्ट होते. मंचाने दिनांक १९/१२/२००८ रोजी दिलेल्या आदेशा प्रमाणे अर्जदाराचे जुने मीटर बदलण्यात आल्याचे नोडल अधिकारी यांनी सांगितले पण नोडल अधिकारी यांना संधी देऊनही त्यांनी जुन्या मीटरचा चाचणी अहवाल मंचात दाखल केलेला नाही म्हणुन अर्जदाराने मिटर सिलची हाताळणी केली व सील संशयास्पद असल्याचे नोडल अधिकारी यांचे म्हणणे मंच मान्य करीत नाही. दिनांक १९/१२/२००८ रोजी मंचाने केलेल्या स्थळपाहणी अहवालात अर्जदाराचा एकुण वीज भार ८० वॅट असा असल्याचे आढळुन आले. अर्जदाराचे मीटर ऑक्टोबर २००३ पासुन बंद असल्यामुळे अर्जदारास मागिल सरासरीवर आधारीत वीज बिल आकारणी करणे योग्य होणार नाही असे मंचाचे मंत आहे. सुनावणी दरम्यान नोडल अधिकारी यांना बिल दुरूस्ती प्रस्ताव मंचात दाखल करण्याचे सांगण्यात आले पण दिलेल्या मुदतीत त्यांनी सदर प्रस्ताव मंचात दाखल केलेला नाही.नोडल अधिकारी यांनी मंचात दाखल केलेल्या सी.पी.एल. चे निरिक्षण केल्यावर अर्जदारास खालील प्रमाणे सरासरीवर आधारीत वीज बिल आकारणी करण्यात आल्याचे दिसुन येते.

| महिना | आकारलेले सरासरीवर आधारीत वीज युनिट |
|---|---|
| डिसेंबर ०४ ते ऑगस्ट ०५ | ०० युनिट |
| सप्टेबर ०५ ते जानेवारी २००६ | १०० युनिट |
| फेब्रुवारी २००६ ते जुन २००६ | ०६ युनिट |
| जुलै २००६ ते ऑक्टोबर २००६ | ७५ युनिट |
| नोव्हेबर २००६ | ० युनिट |
| डिसेबर २००६ ते सप्टेबर २००७ | ७५ युनिट |
| ऑक्टोबर २००७ | ० युनिट |
| नोव्हेबर २००७ | १०० युनिट |
| डिसेबर २००७ | ०३ युनिट |
| जानेंवारी २००८ | ०२ युनिट |
| फेब्रुवारी २००८ | ६४ युनिट |
| मार्च २००८ | १३६ युनिट |
| एप्रिल २००८ ते जुन २००८ | ० युनिट |
| जुलै २००८ ते ऑगस्ट २००८ | ६८ युनिट |
| सप्टेबर २००८ ते ऑक्टोबर २००८ | ० युनिट |

महावितरण तर्फे अर्जदाराचे मीटर डिंसेबर २००३ पासुन बंद असतांना अनेक वेळा वेगवेगळ्या युनिट वीज वापराचे बिल देण्यात आल्याचे स्पष्ट पणे दिसुन येते. त्याचप्रमाणे मागिल पाच वर्षापासुन बंद असलेले मीटर बदली न करता,कोणतीही स्थळ पाहणी न करता, प्रत्यक्ष जोडलेला वीजेचा भार याची पाहणी न करता अर्जदारास बिल आकारणी केल्याचे दिसुन येते.अर्जदाराने मंचात तक्रार दाखल केल्यानंतर व मंचाने स्वतः स्थळ पाहणी केल्यानंतर दिलेल्या आदेशा नुसार अर्जदाराचे जुने मीटर बदलण्यात आले.मंचाने केलेल्या स्थळ पाहणीत अर्जदाराने जोडलेला एकुण वीज भार हा ८० वॅट असा आढळुन आल्यामुळे त्यास जोडलेल्या वीज भाराच्या आधारावर वरील काळासाठी वीज बिल आकारणी करणे योग्य होईल असे मंचाचे मत आहे. अर्जदाराने सध्या जोडलेल्या एकुण वीज भारावर आधारीत व डिसेबर २००३ पुढील काळासाठी वीज आकारणी करणे हे तांत्रीक दृट्या योग्य आहे. वाणिज्य वापरासाठी सर्वसाधारण पणे घेण्यात येणारा लोड फॅक्टर गृहीत धरून अर्जदारास ३० युनिट प्रतिमहा बिल आकारणी करणे योग्य राहील असे मंचाचे मत आहे.

वरील सर्व बाबीचे निरीक्षण केल्यावर अर्जदाराने वाढीव वीज बिलाबाबत केलेली तक्रार योग्य असल्याचे आढळुन येते व मंच याप्रकरणी खालील प्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

# आदेश

१) महावितरण कंपनीने अर्जदारास डिसेबर २००३ ते जुने मिटर बद्दली प्रर्यत च्या काळाकरीता प्रतिमहा ३० युनीट प्रमाणे सुधारीत बिल ३० दिवसात द्यावे.

२) वरील प्रमाणे देण्यात येणा-या सुधारीत वीज बिलात कोणतेही व्याज व दंड आकारू नये व अर्जदाराने या काळात भरलेल्या रक्कमेची वजावट करावी.

वरील आदेशाचे ग्राहक व महावितरण कंपनी यांनी पालन करावे व त्याबाबत मंचास कळवावे.

गा-हाणे निकाली काढण्यात आले असुन हे ग्राहकास व वितरण कंपनीस कळवावे.

| | | |
|---|---|---|
| **हेमंत अ. कापडिया** | **प्र. अ. सगणे** | **विष्णु अं. हंबिरे** |
| **सदस्य** | **सदस्य/सचिव** | **अध्यक्ष** |

# ग्राहक गा-हाणे निवारण मंच

## महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित

## औरंगाबाद परिमंडळ,औरंगाबाद.

जुने पावर हाऊस परिसर.डॉ.बाबासाहेब आंबेडकर रोड, मिल कॉर्नर, औरंगाबाद. - ४३१ ००१, दुरध्वनी व फॅक्स -०२४० - २३३६१७२.

**क्र.सीजीआरएफ/एझेड/यु/१५५/२००८/७६** **दिनांक ;-**

**प्रति,**
**सौ. मालती दिनकरराव कोलपकर,**
**दुकान नंबर ०१, कलानिकेतन अपार्टमेंट,**
**एन एस ४,सिडको एन ४ च्या मागे,**
**औरंगाबाद.**

( तक्रार क्र.सिजीआरएफ/एझेड/यु/१५५/२००८/७६ )

आपण दिनांक २५/११/२००८ रोजी दाखल केलेल्या तक्रारीवरील या मंचाचा आदेश सोबत जोडला आहे. हा आदेश मान्य नसल्यास आपण विद्युत लोकपाल यांच्याकडे ६० दिवसाच्या आंत अपिल दाखल करू शकता.

**प्रत,कार्यकारी अभियंता (प्रशासन),**
**अधिक्षक अभियंता यांचे कार्यालय,**
**म.रा.वि.वि.कं.म. शहर मंडळ, औरंगाबाद**

**सदस्य/सचिव**
**ग्राहक गा-हाणे निवारण मंच**
**म.रा.वि.वि.कं.म.औरंगाबाद.**

**विद्युतलोकपालाचा पत्ता,**
**विद्युत लोकपाल,**
**महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग,**
**६०६-६०८, केशवा,**
**बांद्रा - कुर्ला कॉम्प्लेक्स, मुंबई - ४०० ०५१.**
**दुरध्वनी क्र. ०२२-२६५९०३३९.**

| णहिना | आकारलेले सरासरीवर आधारीत युनिट |
|---|---|
| डिसेंबर ०४ ते ऑगस्ट ०५ | ० युनिट |
| सप्टेबर ०५ ते जानेवारी २००६ | १०० युनिट |
| फेब्रुवारी २००६ ते जुन २००६ | ०६ युनिट |
| जुलै २००६  ते ऑक्टोबर २००६ | ७५ युनिट |
| नोव्हेबर २००६ | ० युनिट |
| डिसेबर २००६ ते सप्टेबर २००७ | ७५ युनिट |
| ऑक्टोबर २००७ | ० युनिट |
| नोव्हेबर २००७ | १०० युनिट |
| डिसेबर २००७ | ०३ युनिट |
| जानेंवारी २००८ | ०२ युनिट |
| फेब्रुवारी २००८ | ६४ युनिट |
| मार्च २००८ | १३६ युनिट |
| एप्रिल २००८ ते जुन २००८ | ० युनिट |
| जुलै २००८ ते ऑगस्ट २००८ | ६८ युनिट |
| सप्टेबर २००८ ते ऑक्टोबर २००८ | ० युनिट |